# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** संरक्षण भारत सरकारच्या मालकीची मौजा सिताबर्डी, शिट क्र.
**{स्थावर विभाग}** 64, सिटी सर्व्हे क्र.339/1, 19380 चौ. फुट. क्षेत्रफळाची जागा श्री. गणेश मंदीर टेकडी संस्थान ला भाडेपट्टयाने मिळणे करीता नागपूर महानगरद्वारा भुसंपादन करणेचा प्रश्न विचारात घेणे.

श्री. गणेश मंदीर टेकडी (दि.ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर) नागपूर द्वारा दि. 19.06.2025 रोजीच्या निवेदनाद्वारे नागपूर महानगरपालिकेस विनंती केलेली आहे की, मौजा-सिताबर्डी, शिट क्र. 64, सिटी सर्व्हे क्र.339/1, 19380 चौ. फुट. क्षेत्रफळाची जागा संरक्षण विभाग भारत सरकारच्या मालकीची आहे. व ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर नागपूर संस्थानास 30 वर्षाच्या भाडेपट्टयावर दिलेली आहे. 30 वर्षाचा कालावधी दि. 28.02.2026 रोजी संपुष्टात येत आहे. व उक्त जागेच्या भाडेपट्टयाचे नुतनिकरण पुन:श्च ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर नागपूर संस्थानाच्या नावे होणार नसल्याने उक्त जागा नागपूर महानगरपालिकेने संपादीत करावी व भुसंपादनाचा सर्व खर्च श्री गणेश मंदीर टेकडी, नागपूर, नागपूर महानगरपालिकेच्या निधीत जमा करण्याकरीता तयार आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने स्थावर विभागाद्वारे मा. आयुक्त, म.न.पा. यांचे कडे प्रस्ताव सादर करण्यात आला. मा. आयुक्त महोदयांनी निदेश दिले की,

- श्री. गणेश मंदीर टेकडी संस्थानास संरक्षण विभागाकडून भाडेपट्टयाने मिळालेली जमीनीचा भाडेपट्टा फेब्रुवारी 2026 रोजी संपुष्टात येत असल्याने जमिनीचे भुसंपादन करणेची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी.
- तत्पुर्वी भुसंपादनाकरीता येणाऱ्या खर्चाची रक्कम संस्थानामार्फत अदा करण्यात येईल. हयाबाबत विधीवत ठराव संस्थानाकडून प्राप्त करून घ्यावा.
- शासकीय मुल्यांकनानुसार येणारी रक्कम संस्थाना मार्फत महानगरपालिकेस अदा करण्यात आल्यावर ती रक्कम भुसंपादनासाठी शासनाकडे जमा करण्यात यावी.
- उक्त जागा एकदाची भुसंपादीत झाली की, सदर जागा श्री. गणेश मंदीर नागपूर संस्थानास नाममात्र दरावर भाडेपट्टयाने देता येऊ शकेल.

उरोक्त निर्देशाचे अनुषंगाने शासकीय मुल्यांकनानुसार जागेची डिमांड रू. 12,40,43,134/- नगर रचना विभाग, म.न.पा. कडून निश्चित करून घेण्यात आली. उक्त रक्कम म.न.पा. निधीत जमा करण्यात येईल. हयाबाबतचा विधीवत ठराव दि.ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर नागपूर द्वारा दि. 14.09.2025 रोजीच्या बैठकीतील विषय क्र. 06 अन्वये पारीत झाल्याचे श्री. गणेश मंदीर टेकडी, नागपूर यांनी दि. 15.09.2025 रोजी च्या पत्रान्वये सभेच्या ईतिवृत्तासह स्थावर विभाग, नागपूर महानगरपालिकेला कळविलेले आहे.

तसेच दि. 21.08.2025 रोजीच्या पत्रान्वये Mr. R.K. Sharma, Col. Offg SO (Land) For GOC यांनी उक्त जागेच्या संपादनाकरीता Government Land Management System Portal द्वारा सादर करण्याबाबत नागपूर महानगरपालिकेला कळविलेले आहे.

उपरोक्त उल्लेखित सर्व बाबी विचारात घेता संरक्षण विभाग भारत सरकाच्या मालकीची मौजा सिताबर्डी, शिट क्र. 64, सिटी सर्व्हे क्र.339/1, क्षेत्रफळ 19380 चौ. फुट. ची जागा भुसंपादन करण्याची प्रक्रिया पुर्ण करणेपुर्वी उक्त जागेच्या मुल्यांकनाची रक्कम रू. 12,40,43,134/- म.न.पा. कडे जमा करून घेऊन Government Land Management System Portal चा वापर करून भुसंपादनाचा प्रस्ताव सादर करणेकरीता उपायुक्त (मालमत्ता) नागपूर महानगरपालिका नागपूर यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येते, नगर रचना विभाग, म.न.पा. शी समन्वय साधुन संरक्षण विभाग भारत सरकार कडून उक्त जागा संपादित करून घेतील व भुसंपादित जागा श्री. गणेश मंदीर टेकडी नागपूर (दि. ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर) रजि. नं. एफ 87 (एन) संस्थानास नाममात्र दरावर भाडेपट्टयाने देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 66/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 07/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (मालमत्ता), स्थावर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार संरक्षण भारत सरकारच्या मालकीची मौजा सिताबर्डी, शिट क्र. ६४, सिटी सर्व्हे क्र.३३९/१, १९३८० चौ. फुट. क्षेत्रफळाची जागा श्री. गणेश मंदीर टेकडी संस्थान ला भाडेपट्टयाने मिळणे करीता नागपूर महानगरद्वारा भुसंपादन करणेचा प्रश्न विचारात घेणे.

श्री. गणेश मंदीर टेकडी (दि.ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर) नागपूर द्वारा दि. १९.०६.२०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे नागपूर महानगरपालिकेस विनंती केलेली आहे की, मौजा-सिताबर्डी, शिट क्र. ६४, सिटी सर्व्हे क्र.३३९/१, १९३८० चौ. फुट. क्षेत्रफळाची जागा संरक्षण विभाग भारत सरकारच्या मालकीची आहे. व ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर नागपूर संस्थानास ३० वर्षाच्या भाडेपट्टयावर दिलेली आहे. ३० वर्षाचा कालावधी दि. २८.०२.२०२६ रोजी संपुष्टात येत आहे. व उक्त जागेच्या भाडेपट्टयाचे नुतनिकरण पुन:श्च ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर नागपूर संस्थानाच्या नावे होणार नसल्याने उक्त जागा नागपूर महानगरपालिकेने संपादीत करावी व भुसंपादनाचा सर्व खर्च श्री गणेश मंदीर टेकडी, नागपूर, नागपूर महानगरपालिकेच्या निधीत जमा करण्याकरीता तयार आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने स्थावर विभागाद्वारे मा. आयुक्त, म.न.पा. यांचे कडे प्रस्ताव सादर करण्यात आला. मा. आयुक्त महोदयांनी निदेश दिले की,

- ➢ श्री. गणेश मंदीर टेकडी संस्थानास संरक्षण विभागाकडून भाडेपट्टयाने मिळालेली जमीनीचा भाडेपट्टा फेब्रुवारी २०२६ रोजी संपुष्टात येत असल्याने जमिनीचे भुसंपादन करणेची प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी.
- ➢ तत्पुर्वी भुसंपादनाकरीता येणाऱ्या खर्चाची रक्कम संस्थानामार्फत अदा करण्यात येईल. हयाबाबत विधीवत ठराव संस्थानाकडून प्राप्त करून घ्यावा.
- ➢ शासकीय मुल्यांकनानुसार येणारी रक्कम संस्थाना मार्फत महानगरपालिकेस अदा करण्यात आल्यावर ती रक्कम भुसंपादनासाठी शासनाकडे जमा करण्यात यावी.

➢ उक्त जागा एकदाची भुसंपादीत झाली की, सदर जागा श्री. गणेश मंदीर नागपूर संस्थानास नाममात्र दरावर भाडेपट्ट्याने देता येऊ शकेल.

उरोक्त निर्देशाचे अनुषंगाने शासकीय मुल्यांकनानुसार जागेची डिमांड रू. १२,४०,४३,१३४/- नगर रचना विभाग, म.न.पा. कडून निश्चित करून घेण्यात आली. उक्त रक्कम म.न.पा. निधीत जमा करण्यात येईल. हयाबाबतचा विधीवत ठराव दि.ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर नागपूर द्वारा दि. १४.०९.२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ०६ अन्वये पारीत झाल्याचे श्री. गणेश मंदीर टेकडी, नागपूर यांनी दि. १५.०९.२०२५ रोजी च्या पत्रान्वये सभेच्या ईतिवृत्तासह स्थावर विभाग, नागपूर महानगरपालिकेला कळविलेले आहे.

तसेच दि. २१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये Mr. R.K. Sharma, Col. Offg SO (Land) For GOC यांनी उक्त जागेच्या संपादनाकरीता Government Land Management System Portal द्वारा सादर करण्याबाबत नागपूर महानगरपालिकेला कळविलेले आहे.

उपरोक्त उल्लेखित सर्व बाबी विचारात घेता संरक्षण विभाग भारत सरकाच्या मालकीची मौजा सिताबर्डी, शिट क्र. ६४, सिटी सर्व्हे क्र.३३९/१, क्षेत्रफळ १९३८० चौ. फुट. ची जागा भुसंपादन करण्याची प्रक्रिया पुर्ण करणेपुर्वी उक्त जागेच्या मुल्यांकनाची रक्कम रू. १२,४०,४३,१३४/- म.न.पा. कडे जमा करून घेऊन Government Land Management System Portal चा वापर करून भुसंपादनाचा प्रस्ताव सादर करणेकरीता उपायुक्त (मालमत्ता) नागपूर महानगरपालिका नागपूर यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येते, नगर रचना विभाग, म.न.पा. शी समन्वय साधुन संरक्षण विभाग भारत सरकार कडून उक्त जागा संपादित करून घेतील व भुसंपादित जागा श्री. गणेश मंदीर टेकडी नागपूर (दि. ॲडव्हायझरी सोसायटी ऑफ गणेश मंदीर) रजि. नं. एफ ८७ (एन) संस्थानास नाममात्र दरावर भाडेपट्ट्याने देण्याच्या प्रस्तावास मा. प्रस्तावास मंजुरी प्रदान केली.